# केंद्र व राज्य शासनाकडून दिव्यांग व्यक्तींसाठी राबविण्यात येणा-या योजना

| केंद्र शासनाच्या अपंग व्यक्तींसाठी योजना:- | |
|---|---|
| **अ.क्र.** | **योजनेचे नांव** |
| १ | मुदत कर्ज योजना (लहान व मध्यम व्यवसायासाठी) |
| २ | शैक्षणिक कर्ज योजना |
| ३ | सुक्ष्म पत पुरवठा योजना |

| महाराष्ट्र शासनाच्या अपंग व्यक्तींसाठी योजना:- | |
|---|---|
| **अ.क्र.** | **योजनेचे नांव** |
| १ | अपंग विद्यार्थ्यांना विशेष शाळांमार्फत शिक्षण |
| २ | शालांत परिक्षा पूर्व शिक्षणासाठी अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती |
| ३ | शालांत परिक्षोत्तर शिक्षणासाठी अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती |
| ४ | कार्यशाळांमधून अपंगांना व्यवसाय प्रशिक्षण |
| ५ | अपंग व्यक्तींना सरळ सेवेमध्ये भरतीसाठी ३ टक्के आरक्षण |
| ६ | उच्च वयोमर्यादेमध्ये शिथिलता |
| ७ | पदोन्नतीमध्ये अपंग व्यक्तींना ३ टक्के आरक्षण |
| ८ | अपंग व्यक्तींसाठी रोजगार मेळावे |
| ९ | अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल |
| १० | प्रशिक्षित अपंगांना व्यवसायासाठी अर्थ सहाय्य |
| ११ | अपंग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने पुरविणे |
| १२ | अपंग व्यक्तींना एस.टी. प्रवास भाडयामध्ये प्रवास सवलत |
| १३ | राष्ट्रीय विश्वस्त न्यास अधिनियम १९९९ कायदेशीर पालकत्व देण्याची योजना |

| जिल्हा परिषद नागपूर व्दारा दिव्यांग विषयक विविध कल्याणकारी योजना खालीलप्रमाणे आहेत:- | |
|---|---|
| **अ.क्र.** | **योजनेचे नाव** |
| १ | दिव्यांग व्यक्तींना विवाहासाठी प्रोत्साहनपर अनुदान देणे. |
| २ | संगणक प्रशिक्षण केंद्रामध्ये या संगणक कोर्ससाठी १०० टक्के अनुदान देण्याची योजना |
| ३ | कमरेपासून खाली दिव्यांगत्व असलेल्या अस्थिव्यंग व्यक्तीला<br>तीन चाकी सायकल / मोटोराईज ट्रायसायकल (बॅटरी ऑपरेटेड) पुरविणे. |
| ४ | मनोविकलांग व्यक्तींकरिता नॅशनल ट्रस्टमार्फत राबविण्यात येणा-या<br>निरामय विमा योजनेचे हप्ते भरणेकरिता अर्थसहाय्य देणे. |
| ५ | अंध व्यक्तीसाठी सहाय्यभूत साधने व उपकरणासाठी अर्थसहाय्य करणे. |
| ६ | दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी झेराक्स मशिन पुरविणे. |
| ७ | कर्णबधीर व्यक्तीसाठी विविध प्रकारची वैय्यक्तिक श्रवणयंत्रे पुरवणे |

| जि.प.5 टक्के दिव्यांग कल्याण निधी अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विशेष नाविन्यपूर्ण योजना | |
|---|---|
| **अ.क्र.** | **योजनेचे नाव** |
| १ | दिव्यांग व्यक्तीकरिता घरकुल योजना |
| २ | राजमाता जिजाऊ अर्थसहाय्य योजना |

| राष्ट्रीय दिव्यांग वित्त अणि विकास महामंडळ | |
|---|---|
| **अ.क्र.** | **योजनेचे नाव** |
| १ | दिव्यांगजन स्वावलंबन योजना |
| २ | विशेष मायक्रोफायनान्स योजना (VMY) |
| ३ | दीनदयाल दिव्यांग पुनर्वसन योजना (DDRS) |
| ४ | पदव्युत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना |

| नागपूर महानगर पालिका, समाज विकास विभाग अंतर्गत दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी विविध कल्याणकारी योजना:- | |
|---|---|
| **अ.क्र.** | **योजनेचे नाव** |
| १ | कर्णबधीर दिव्यांग व्यक्तींना (शस्त्रक्रिये करिता अर्थसहाय्य योजना.) |
| २ | दिव्यांगाना वैयक्तिक स्वयंरोजगाराकरिता, दिव्यांग बचत गटांना स्वयंरोजगाराकरिता अर्थसहाय्य योजना. |
| ३ | मतीमंद घटकातील दिव्यांगाना निर्वाह भत्ता योजना |
| ४ | दिव्यांगांसाठी शिष्यवृत्ती व व्यवसाय प्रशिक्षणासाठी अर्थ सहाय्य योजना |
| ५ | दिव्यांगाना सहाय्यभूत साधने व तंत्रज्ञान याकरिता अर्थसहाय्य |
| ६ | प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत नासुप्र, म्हाडा, मनपा तर्फे बांधण्यात आलेल्या व बांधण्यात येत असलेल्या मनपा हद्दीतील बांधकामाकरिता सोडत पद्धतीने निवड झालेल्या लाभार्थ्यांना नागपूर महानगर पालिकेकडून रु.५०,०००/- आर्थिक सहाय्य (सहाय्य योजना) |
| ७ | राज्यस्तरीय, राष्ट्रस्तरीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा मध्ये भाग घेणा-या दिव्यांग खेळाडूंना आर्थिक सहाय्य योजना |

| **अ.क्र.** | **योजनेचे नाव** |
|---|---|
| ८ | अंत्योदय योजना अंतर्गत दिव्यांग बांधवाना स्वयंरोजगार मिळावा या उउदेश्याने ई-रिक्षा वाटप योजना |
| ९ | नागपूर शहरातील दिव्यांगाना मोटराईज्ड ट्रायसायकल वाटप करणे. |

दिव्यांग व्यक्ती सक्षमीकरण

# केंद्र व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, अधिनियम व सवलतींची

## माहिती पुस्तिका



जिल्हा प्रशासन, नागपूर

Scanned with CamScanner

दिव्यांग व्यक्ती सक्षमीकरण

# केंद्र व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, अधिनियम व सवलतींची

## माहिती पुस्तिका

**जिल्हा प्रशासन, नागपूर**

Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


- दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016-दिव्यांग व्यक्तिंसाठी कायदे आणि धोरणे ........ 1
- दोन कायद्यांमधील तुलनात्मक फरक बदल ........ 8
- स्वावलंबन कार्ड/Unique ID ........ 9
- दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 -अंमलबजावणी ........ 10
- दिव्यांग उन्नती पोर्टल ........ 11
- दिव्यांगांसाठी राष्ट्रीय संस्था ........ 12
- दिव्यांग व्यक्तींकरीता केंद्र शासनाच्या विविध कल्याणकारी योजना ........ 14
- सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय, भारत सरकारच्या
दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या गैर-सरकारी संस्थांसाठी योजना ........ 15
- दिव्यांग सशक्तिकरण विभाग, सामाजिक न्याय व हक्क मंत्रालय,
- भारत सरकारच्या विविध योजना ........ 17
- दिव्यांग व्यक्तींचे पुनर्वसन आणि कल्याण विषयक महाराष्ट्र राज्याचे शासन निर्णय ........ 20
- जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, नागपूर द्वारा दिव्यांग व्यक्तींना देण्यात येणाऱ्या
सेवा व सुविधा ........ 22
- जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, नागपूर-ध्येय व धोरणे ........ 23
- 21 दिव्यांग प्रवर्गाचा समावेश ........ 24
- जिल्हा परिषद नागपूर द्वारा दिव्यांग विषयक विविध कल्याणकारी योजना ........ 25
- जि.प.५ टक्के दिव्यांग कल्याण निधी अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या
- विशेष नाविन्यपूर्ण योजना ........ 27
- नागपूर जिल्ह्यातील खाजगी अनुदानित दिव्यांग शाळा / कर्मशाळा ........ 30
- समेकित क्षेत्रीय कौशल्य विकास, पुनर्वास एव दिव्यांगजन सशक्तिकरण केंद्र, नागपूर ........ 34
- निरामय आरोग्य विमा योजना ........ 48
- नागपूर महानगर पालिका समाज विकास विभाग अंतर्गत
दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी विविध कल्याणकारी योजना ........ 50


Scanned with CamScanner



**मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस**
उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा
पालकमंत्री, नागपूर शहर

देवेंद्र फडणवीस
उप मुख्यमंत्री
महाराष्ट्र

मंत्रालय
मुंबई ४०० ०३२

# शुभेच्छा

राज्यातील दिव्यांग बांधवांच्या अडचणी लक्षात घेऊन शासनाने 'दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी' हे अभियान राबविण्याचा निर्णय घेतला. याअंतर्गत नागपूर येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे ही अतिशय आनंददायक बाब आहे.

नागपूर जिल्हा प्रशासन, नागपूर महानगरपालिका आणि समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद नागपूर यांचे संयुक्त विद्यमाने "दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी" या राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. अभियानाच्या आयोजनाबद्दल अभिनंदन आणि यशस्वीतेसाठी हार्दिक शुभेच्छा!

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात या निमित्ताने शिबिराचे आयोजन करण्यात येणार असून या अभियानामुळे एकाच ठिकाणी दिव्यांगांना विविध योजनांचा लाभ मिळण्यास मदत होणार आहे.

दिव्यांग बांधवांमध्ये विविध प्रवर्गातील दिव्यांग आहेत. त्यातील अनेकजण विभागीय स्तरावर तसेच शासकीय कार्यालयात जाऊन आपल्या अडीअडचणी नोंदवू शकत नाहीत. त्यामुळे शासनानेच दिव्यांगांना आपल्या अडीअडचणी मांडण्यासाठी उपाययोजना केली आहे.

दिव्यांगांना विविध योजनांचा लाभ तसेच त्यांच्या विविध प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने 'दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी' हे अभियान निश्चितच उपयुक्त ठरेल असा विश्वास आहे. या अभियानाचा लाभ राज्यातील दिव्यांग बांधवांना होणार आहे. अभियानाच्या आयोजनाबद्दल अभिनंदन आणि यशस्वीतेसाठी हार्दिक शुभेच्छा!

(देवेंद्र फडणवीस)

कार्यालय : ६ वा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दूरध्वनी : ०२२-२२०२ ५०१४ / २२०२ २४०१
ई-मेल : dcm@maharashtra.gov.in, संकेत स्थळ : www.maharashtra.gov.in

Scanned with CamScanner



सौ मुक्ताताई कोकड्डे
अध्यक्षा
जिल्हा परिषद नागपूर

# शुभेच्छा संदेश

भारतीय राज्यघटनेने देशातील प्रत्येक नागरिकाला समान हक्क व अधिकार प्रदान केले आहेत. दिव्यांग वर्ग हा समाजाचा मोठा घटक या अधिकारांपासून वंचित राहिलेला आहे. दिव्यांगाचा सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक, सांस्कृतिक विकास साधावा जावा, त्यांचे शोषण होऊ नये यासाठी केंद्र व राज्य सरकारने विविध योजना व सवलती दिल्या आहेत. या योजना व सवलतींची सविस्तर व अधिकृत माहिती देणारी पुस्तिका प्रकाशित करण्यात येत आहे. तळागाळातील प्रत्येक दिव्यांग व्यक्तीपर्यंत ही माहिती पोहोचावी व त्यांना शासकीय योजनांचा लाभ घेणे व स्वत:ची उन्नती साधणे सहज सोपे व्हावे, हा या माहितीपुस्तिका प्रकाशित करण्यामागील उद्देश आहे.

दिव्यांग व्यक्ती या माहितीपुस्तिकेचा लाभ करूनघेतील, अशी आशा व्यक्त करते.

Scanned with CamScanner



**डॉ. अभिजीत चौधरी**

आयुक्त,
महानगरपालिका नागपूर

# शुभेच्छा संदेश

दिव्यांगत्व हे एकतर नैसर्गिक असते किंवा अपघाताने अनेक लोक दिव्यांग होत असतात. समाजातील अशा दिव्यांग घटकाची संख्या मोठी आहे. बरेचदा दिव्यांगत्वामुळे त्यांच्या सामाजिक, आर्थिक विकासात बाधा निर्माण होतात. अशा दिव्यांग व्यक्तींना त्यांचे हक्क प्राप्त करून देणे आणि त्यांच्यासाठी सरकारद्वारे जाहीर केलेल्या योजनांचा त्यांना पूर्ण लाभ मिळवून देणे, यासाठी प्रशासन नेहमी आग्रही असते. दिव्यांगांमध्ये त्यांच्या हक्कांबद्दल जागृती करण्याची आवश्यकता असते. त्यासाठी जिल्हा प्रशासनाने केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना व सवलतींची विस्तृत आणि अधिकृत माहिती असलेली एक पुस्तिका तयार केली आहे. या योजनांचा लाभ प्रत्येक दिव्यांग व्यक्तीला मिळावा व त्याचे जीवनमान उंचावले जावे, हा त्यामागील उद्देश आहे.

ही माहितीपुस्तिका प्रकाशित करताना आम्हाला अतीव आनंद होत आहे. या माहितीपुस्तिकेचा लाभ दिव्यांग बांधव नक्कीचघेतील, असा मला विश्वास आहे.

सदर माहितीपुस्तिकेला माझ्या अनेक शुभेच्छा.

Scanned with CamScanner



**डॉ. विपिन**
जिल्हाधिकारी, नागपूर

# शुभेच्छा संदेश

दिव्यांग बांधव हे समाजातील महत्त्वाचे घटक आहेत. अंध, कर्णबधिर, अस्थिव्यंग, मानसिक विकलांग असे विविध प्रकारचे दिव्यांगत्व असलेल्या या बांधवांना प्रोत्साहन मिळावे, त्यांच्यातील गुणवत्तेला, कलागुणांना वाव मिळावा यासाठी महाराष्ट्र सरकार कटीबद्ध आहे. केंद्र व राज्य सरकारतर्फेदिव्यांग व्यक्तींच्या कल्याणार्थ अनेक योजनाराबविल्या जातात. त्यांना विविध प्रकारच्या सवलतीदेखील दिल्या जातात.

नुकतेच राज्यात दिव्यांग कल्याणासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. दिव्यांगांसाठी स्वतंत्र मंत्रालय निर्माण करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. या मंत्रालयामार्फत दिव्यांग विकासाच्या अनेक योजना राबविल्या जाणार असून दिव्यांगासाठी स्वतंत्र विद्यापीठ, रोजगार आणि शिक्षणामध्ये त्यांना संधी, मुकबधिर विद्यार्थ्यांसाठी साईन लॅग्वेज विकसित करणे आदी अनेक बाबींचादेखील सरकार गांभीर्याने विचार करत आहे.

सरकारच्या अशा विविध योजना व सवलतींची अधिकृत माहिती दिव्यांगजनांपर्यंत पोहोचवण्यासाठी जिल्हा प्रशासनातर्फे एका सविस्तर माहितीपुस्तिका तयार केली गेली आहे. या माहितीपुस्तिकेमुळे समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत ही माहिती व योजना पोहोचतील आणि पात्र दिव्यांग लाभार्थ्यांना त्यांचा लाभ घेणे सोयीचे होईल, अशी मला खात्री आहे.

सदर माहितीपुस्तिकेसाठी माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा

Scanned with CamScanner



**श्रीम. सौम्या शर्मा**
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नागपूर

## शुभेच्छा संदेश

दिव्यांगांसारख्या समाजातील दुर्बल आणि वंचित घटकांच्या कल्याणासाठी तसेच, त्यांच्या सर्वांगीण उत्थानासाठी जिल्हा परिषदेचा समाज कल्याण विभाग नेहमीच कटीबद्ध राहिलेला आहे. केंद्र व राज्य शासनाच्या अनेकविध कल्याणकारी योजना दिव्यांग प्रवर्गासाठी राबविण्यात येतात. बरेचदा अशा योजनांची योग्य माहिती न मिळाल्यामुळे अनेक लाभार्थी या योजनांपासून वंचित राहतात. त्यांच्यापर्यंत योजनांची अधिकृत माहिती सविस्तरपणे पोहोचावी या उद्देशाने माहितीपुस्तिका तयार करण्यात आलेली आहे. या माहितीपुस्तिकेमध्ये स्वावलंबन कार्ड कसे प्राप्त करावे, त्यासाठी कोणती कागदपत्रे सादर करावी यासह दिव्यांगांसाठीचे कायदे, विविध कल्याणकारी योजना, सवलतींचा सविस्तर उहापोह करण्यात आलेला आहे.

ही माहितीपुस्तिका दिव्यांगांना त्यांच्याशी संबंधित सर्व शासकीय माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणारे सहज आणि सोपे दस्तऐवज आहे. या माहितीपुस्तिकेचा दिव्यांगजनांनी लाभ करून घ्यावा, असे मी आवाहन करते.

सदर माहितीपुस्तिकेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

Scanned with CamScanner



**मिलींद सुटे**
सभापती,
समाज कल्याण समिती, जि. प. नागपूर

# शुभेच्छा संदेश

दिव्यांग व्यक्तिच्या सक्षमीकरणासाठी केंद्र व राज्य शासनातर्फे विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. स्थानिक स्वराज्य संस्थाकडून दिव्यांगांना अनेक सवलींचा लाभा देण्याचा प्रयत्न असतो. यामागे दिव्यांगांच्या जिवनात महत्वपूर्ण बदल घडविणे, सामाजिक जीवनमान उंचावणे आणि व्यावसायिक पुर्नवसनाच्या माध्यमातून त्यांचे जीवन सुखदायक करण्याचा प्रयत्न असतो. दिव्यांगाबाबतच्या योजना व सवलतीची माहिती अतिशय सोप्या भाषेत आणि विस्तृतपणे देणारी माहिती पुस्तिका आहे.

दिव्यांगांना त्यांचे हक्क व अधिकार काय आहे याची जाणीव व्हावी या उद्देशाने तयार करण्यात आलेली माहिती पुस्तिका त्यांच्या आयुष्यात आशेचा किरण ठरेल, याची मला खात्री आहे. प्रशासनाच्या या उपक्रमाला माझ्या शुभेच्छा!

Scanned with CamScanner

# THE RIGHTS OF PERSONS WITH DISABILITIES ACT, 2016

# दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016

## दिव्यांग व्यक्तींसाठी कायदे आणि धोरणे

(ACTS & POLICIES FOR PERSONS WITH DISABILITIES)

- **दिव्यांग व्यक्तींचे हक्क कायदा, 2016**

  Rights of Person with Disabilities Act, 2016

- **दिव्यांग व्यक्ती (समान संधी, पूर्ण सहभाग आणि हक्कांचे संरक्षण) कायदा, 1995**

  (Person with Disabilities, (Equal Opportunities, Full Participation and Protection of Rights) Act, 1995)

- **ऑटिझम, सेरेब्रल पाल्सी, मानसिक मंदत्व आणि एकाधिक दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी राष्ट्रीय न्यास कायदा, 1999**

  (National Trust for Welfare of Persons with Autism, Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities Act, 1999)

- **भारतीय पुनर्वसन परिषद कायदा, 1992**

  (Rehabilitation Council of India Act, 1992)

- **मानसिक आरोग्य काळजी कायदा, 2017**

  (Mental Health Care Act, 2017)

- **मानसिक आरोग्य कायदा, 1987**

  (Mental Health Act, 1987)

- **दिव्यांग व्यक्तींच्या हक्कासाठी संयुक्त राष्ट्र संघटन**

  United Nations Convention on the Rights of People with Disabilities (UNCRPD)

- **बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा, 2009**

  Right of Children to Free and Compulsory Education (RTE) ACT, 2009

- **माहितीचा अधिकार कायदा, 2005**

  (Right to Information Act, 2005)

Scanned with CamScanner

# दिव्यांग व्यक्ती हक्क कायदा, 2016

## मुख्य वैशिष्ट्ये .....

- संयुक्त राष्ट्र महासभेने पहिल्यांदा 13 डिसेंबर 2006 रोजी दिव्यांग व्यक्तींच्या हक्कांवर ठराव मंजूर करण्यात आला.
- 27 डिसेंबर 2016 रोजी संसदेत राष्ट्रपतींनी त्याला संमती दिली.
- दिव्यांग व्यक्तींचे हक्क कायदा 19 एप्रिल 2017 रोजी संपूर्ण भारतात लागू करण्यात आला.
- दिव्यांग व्यक्तींचे हक्क कायदा, 2016 मध्ये एकूण 17 प्रकरणे आणि 102 लेख आहेत.
- या कायद्यात दिव्यांगता संकल्पनेच्या आधारे व्याख्या करण्यात आली आहे.
- दिव्यांगत्वाचे प्रकार 7 वरून 21 पर्यंत वाढवले गेले.
- आता केंद्र सरकारला दिव्यांगत्वाचे आणखी प्रकार त्यात समाविष्ट करण्याचे जोडण्याचे स्वातंत्र्य मिळाले.
- यामध्ये प्रथमच वाक् व भाषा दिव्यांगता आणि विशेष शैक्षणिक दिव्यांगत्वाचा समावेश करण्यात आला आहे.
- यामध्ये ॲसिड हल्ल्यातील पीडितांचा समावेश करण्यात आला आहे.
- यामध्ये रक्ताशी संबंधित 3 विकारांचा (हिमोफिलिया, थॅलेसेमिया, सिकलसेल रोग) समावेश करण्यात आला आहे.
- आता दिव्यांग लोकांवरील गुन्ह्यांसाठी दंड भरावा लागेल.
- राज्य आयुक्तांच्या अधिकारात वाढ करण्यात आली आहे.
- दिव्यांग व्यक्तींवरील हिंसाचाराच्या खटल्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात एक विशेष न्यायालय राहिल.
- दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या हक्कांचा समान लाभ मिळावा, याची खात्री करणे ही सरकारची जबाबदारी राहिल.
- सार्वजनिक इमारतींमध्ये दिव्यांगांसाठी सुलभतेवर भर दिला गेला आहे.
- दिव्यांग व्यक्तींना आर्थिक सहाय्य देण्यासाठी राष्ट्रीय आणि राज्य निधीची निर्मिती करण्यात आली आहे.
- जिल्हा स्तरीय समिती स्थापन करण्याची यात तरतूद आहे.

Scanned with CamScanner

# THE RIGHTS OF PERSONS WITH DISABILITIES, ACT, 2016

# दिव्यांग व्यक्ती हक्क कायदा, 2016

## CHAPTER / (प्रकरण)-1

### PRELIMINARY (प्राथमिक)

- लघू शीर्षक आणि प्राथमिक माहिती.
- संबंधित व्याख्या तपशीलवार स्पष्ट केल्या आहेत.

## CHAPTER / (प्रकरण)-2

### RIGHTS AND ENTITLEMENTS (अधिकार आणि हक्क)

- दिव्यांगत्वाच्या आधारावर समानता आणि भेदभाव न करण्याची तरतूद.
- दिव्यांग महिला आणि दिव्यांग मुलांसाठी विशेष तरतुदी.
- दिव्यांगता संशोधनासाठी केंद्रीय समितीची स्थापना.
- दिव्यांग व्यक्तींना संशोधनाचा विषय समजू नये.
- कार्यकारी दंडाधिकार्यांनी अवलंबावयाच्या प्रक्रियेचे वर्णन.
- मतदान प्रक्रिया सुलभता

## CHAPTER / (प्रकरण)-3

### EDUCATION (शिक्षण)

- जिल्हा शिक्षण कार्यालयात नोडल अधिकारी नियुक्त करणे.
- सर्वसमावेशक शिक्षणाचा प्रचार आणि सुविधा देण्यासाठी विशिष्ट उपाय.
- अपंगांसाठी 18वर्षांपर्यंतमोफतशिक्षणाचीतरतूद.
- शैक्षणिक क्षेत्रात 5% आरक्षणाची तरतूद.
- संप्रेषण वर्धक आणि अनुकूल माध्यमांच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न.
- दिव्यांग विद्यार्थ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अभ्यासक्रम आणि परीक्षेत योग्य ते बदल करणे.

## CHAPTER / (प्रकरण)-3

### SKILL DEVELOPMENT AND EMPLOYMENT (कौशल्य विकास आणि रोजगार)

- व्यावसायिक प्रशिक्षण आणि स्वयंरोजगारासाठी विशेष तरतुदी.
- नोकरीत भेदभाव न करण्याकडे विशेष लक्ष.
- समान संधी धोरणाचे पालन केले आहे.
- प्रत्येक कार्यक्षेत्रात तक्रार निवारण अधिकारी नियुक्त करावा.
- रोजगार क्षेत्रात 4% आरक्षणाची तरतूद.
- सवलतीच्या दरात कर्ज देण्याची तरतूद.
- तक्रार निवारण अधिकाऱ्याची नियुक्ती.



Scanned with CamScanner

## CHAPTER / (प्रकरण)-5

## SOCIAL SECURITY, HEALTH, REHABILITATION AND RECREATION
## (सामाजिक सुरक्षा, आरोग्य, पुनर्वसन आणि मनोरंजन)

- पेन्शन, विमा योजना आणि दिव्यांगांचे पुनर्वसन यावर भर.
- संशोधन आणि विकासासाठी योजना.
- औषध आणि आरोग्य सेवा क्षेत्र विकसित करणे.
- कला, संस्कृती आणि मनोरंजन सुविधा विकसित करणे.
- क्रीडा उपक्रमांमध्ये सहभाग सुनिश्चित करून उपक्रमांना प्रोत्साहन देणे.

## CHAPTER / (प्रकरण)-6

## SPECIAL PROVISIONS FOR PERSONS WITH BENCHMARK DISABILITIES
## (बेंचमार्क दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींसाठी विशेष तरतुदी)

- बेंचमार्क दिव्यांग मुलांना मोफत शिक्षणाची तरतूद.
- उच्च शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण आणि पदांसाठी 5% आरक्षण.
- उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्रवेशासाठी कमाल वयोमर्यादा इतरांपेक्षा 5 वर्षे अधिक.
- खाजगी क्षेत्रातील नियोक्त्यांना प्रोत्साहन देणे.
- विशेष रोजगार विनिमय निर्माण करणे.
- शेतजमीन, निवासी, सर्व विकास योजना, सवलतीच्या दराने जमीन वाटप यामध्ये ५% आरक्षण.

## CHAPTER / (प्रकरण)-7

## SPECIAL PROVISIONS FOR PERSONS WITH DISABILITIES WITH HIGH SUPPORT NEEDS
## (अधिक मदतीची गरज आवश्यक असलेल्या दिव्यांग व्यक्तींसाठी विशेष तरतुदी)

- अधिक मदतीची गरजा असलेल्या अपंग व्यक्तींसाठी विशेष तरतूद करण्यात आली आहे.
- योग्य पुनर्वसन व्यवस्थेची मागणी करण्याचा अधिकार.
- अपंग व्यक्ती किंवा त्याच्यावतीने इतर कोणतीही व्यक्ती किंवा संस्था अधिक सहाय्यासाठी अर्ज करू शकतात.

Scanned with CamScanner

CHAPTER / (प्रकरण)-8

## DUTIES AND RESPONSIBILITIES OF APPROPRIATE GOVERNMENTS

## (सरकारची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या)

- दिव्यांग व्यक्तींशी संबंधित अधिकाधिक जागरूकता आणि समर्थन मोहिमा चालवणे.
- भौतिक वातावरण, वाहतूक, माहिती आणि संवाद तंत्रज्ञाना पर्यंत पोहोचण्याठी सुलभता निर्माण करण्यास प्रोत्साहन देणे.
- ग्राहकोपयोगी वस्तूंचे उत्पादन करणे. सुलभता मानके अनिवार्य करणे.
- विद्यमान पायाभूत सुविधा आणि परिसरात सुलभता निर्माण करण्यासाठी आणि त्या उद्देशाने कार्यवाही करण्यासाठी कालमर्यादा निश्चित करणे.
- सेवा प्रदात्यांद्वारे सुलभता निर्माण करण्यासाठी वेळ मर्यादा निश्चित करणे.
- मनुष्यबळ विकासावर अधिक भर देणे.
- सामाजिक परीक्षण करणे.

CHAPTER / (प्रकरण)-9

## REGISTRATION OF INSTITUTIONS FOR PERSONS WITH DISABILITIES AND GRANTS TO SUCH INSTITUTIONS

## दिव्यांग व्यक्तींच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांची नोंदणी आणि अनुदान

- अपंग व्यक्तींच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांची नोंदणी करणे आणि नोंदणी नूतनीकरण अनिवार्य आहे.
- नोंदणी रद्द करण्याची प्रक्रिया.
- नोंदणीकृत संस्थांना आर्थिक सहाय्य देण्याची तरतूद.
- सक्षम अधिकाऱ्याची नियुक्ती.

CHAPTER / (प्रकरण)-10

## CERTIFICATION OF SPECIFIED DISABILITIES

## विशिष्टदिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र

- विशिष्ट अपंगत्वांचे प्रमाणन आणि मूल्यांकनासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी करणे.
- प्रमाणन प्राधिकरणांना सक्षम करणे.
- प्रमाणपत्रासाठी प्रक्रिया विकसित करा.
- अर्जदार राहात असलेल्या जिल्ह्याच्या वैद्यकीय अधिकाऱ्याकडे अर्ज करू शकतो.
- अल्पवयीन किंवा बौद्धिक दृष्ट्या अक्षम व्यक्तीच्या बाबतीत, ही प्रक्रिया त्याचे कायदेशीर पालक किंवा नोंदणीकृत संघटनेद्वारे केले जाईल.
- प्रमाणन प्राधिकरणाच्या निर्णया विरुद्ध अपील करण्याचीही सुविधा आहे.

Scanned with CamScanner

**CHAPTER / (प्रकरण)-11**

## CENTRAL AND STATE ADVISORY BOARDS ON DISABILITY AND DISTRICT LEVEL COMMITTEE

## (दिव्यांग व्यक्तींसाठी केंद्रीय आणि राज्य सल्लागार मंडळे आणि जिल्हास्तरीय समितीची स्थापना)

- दिव्यांग व्यक्तिंसाठी केंद्रीय सल्लागार मंडळ तयार करून, सदस्यांच्या सेवेचे नियम आणि अटी तयार करणे.
- दिव्यांग व्यक्तिंवर केंद्रीय, राज्य आणि जिल्हास्तरीय समित्या स्थापन करून सल्लागार मंडळाची बैठक घेणे आणि त्यांच्या कामाचे विश्लेषण करणे.
- एकूण 18 सदस्यांपैकी 3 वाणिज्य आणि उद्योग स्तरावरील, 5 दिव्यांगत्व आणि पुनर्वसन क्षेत्रातील तज्ज्ञ, 10 गैर-सरकारी संस्थांमधून असावेत, ज्यात 5 महिला आणि 1 अनुसूचित जाती व 1 अनुसूचित जमातीचा सदस्य असावा.
- दिव्यांग व्यक्तिंचा पूर्ण सहभाग सुनिश्चित करण्यासाठी कायदे, धोरणे आणि कार्यक्रमांच्या प्रभावाचे मूल्यांकन करणे.

**CHAPTER / (प्रकरण)-11**

## CHIEF COMMISSIONER AND STATE COMMISSIONER FOR PERSONS WITH DISABILITIES

## (दिव्यांग व्यक्तींसाठी मुख्य आयुक्त आणि राज्य आयुक्त)

- मुख्य आयुक्त आणि राज्य आयुक्तांची नियुक्ती आणि त्यांच्या कर्तव्यांचे वर्णन.
- मुख्य आयुक्तांच्या शिफारशी नुसार योग्य प्राधिकरणांकडून कारवाई करणे.
- मुख्य आयुक्तांना मदत करण्यासाठी दोन आयुक्तांची नियुक्ती, त्यापैकी एक दिव्यांग व्यक्ती असेल.
- मुख्य आयुक्तांच्या देखरेखीखाली आणि नियंत्रणाखाली 11 सदस्यांच्या सल्लागार समितीची स्थापना.
- मुख्य आयुक्तांकडून वार्षिक आणि विशेष अहवाल केंद्र सरकारला सादर करणे.
- राज्य आयुक्तांच्या नियंत्रणाखाली 5 सदस्यांची सल्लागार समिती तयार करणे.

**CHAPTER / (प्रकरण)-12**

## SPECIAL COURT (विशेष न्यायालय)

- दिव्यांग व्यक्तींच्या हक्क कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या गुन्ह्यांसाठी विशेष न्यायालयांची तरतूद.
- दिव्यांगांसाठी जिल्हा स्तरावर विशेष सरकारी वकिलाची व्यवस्था.

Scanned with CamScanner

CHAPTER / (प्रकरण)-14

## NATIONAL FUND FOR PERSONS WITH DISABILITIES
## (दिव्यांग व्यक्तींसाठी राष्ट्रीय निधी)

- दिव्यांग व्यक्तींसाठी 'राष्ट्रीयनिधी' नावानेओळखला जाणार एक निधी तयार केला जाईल आणि त्याचा वापर केला जाईल.
- राष्ट्रीय निधीचे खाते आणि लेखापरीक्षण.

CHAPTER / (प्रकरण)-15

## STATE FUND FOR PERSONS WITH DISABILITIES
## (दिव्यांग व्यक्तींसाठी राज्य निधी)

- राज्य सरकारने विहित केल्यानुसार दिव्यांग व्यक्तींसाठी 'राज्यनिधी' म्हणून संबोधल्या जाणार्या निधीची राज्य सरकार द्वारे स्थापना आणि वापर केला जाईल.

CHAPTER / (प्रकरण)-16

## OFFENCES AND PENALTIES
## (गुन्हे आणि दंड)

- कायदा किंवा अटी किंवा नियमांचे उल्लंघन केल्या बद्दल शिक्षेची तरतूद.
- बेंचमार्क दिव्यांग लोकांसंदर्भात फसवणूक केल्या बद्दल शिक्षेची तरतूद.
- दिव्यांग व्यक्तींवरील अत्याचाराच्या गुन्ह्यांसाठी शिक्षेची तरतूद.
- योग्य माहिती देण्यास अक्षम ठरल्याबद्दल शिक्षा.
- दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या लाभांचा इतर कोणी व्यक्ती लाभ घेत असल्यास त्याला दोन वर्षे कारावास किंवा एक लाख रुपये दंड अशी शिक्षा आहे.

CHAPTER / (प्रकरण)-17

## MISCELLANEOUS (इतर)

- हा कायदा इतर कायद्यांच्या वापरावर प्रतिबंध घालत नाही.
- हा कायदा सद्भावनेने केलेल्या कृतींचे संरक्षण करतो.
- या कायद्यामध्ये दिव्यांग व्यक्तींच्या अडचणी दूर करण्याचा अधिकार आहे.
- अनुसूची मध्ये सुधारणा करण्याचा अधिकार कायद्यात आहे.
- राज्य सरकार आणि केंद्र सरकारला नियम बनवण्याचे स्वातंत्र्य आहे.

Scanned with CamScanner

# दोन कायद्यांमधील तुलनात्मक फरक बदल

| दिव्यांग व्यक्ति हक्क अधिनियम, 2016 | दिव्यांग व्यक्ति अधिनियम, 1995 |
|---|---|
| एकूण 17 प्रकरण आणि 102 कलम | एकूण 14 प्रकरण आणि 100 कलम |
| 21 दिव्यांगत्व प्रकारांचा समावेश | फक्त 7 दिव्यांगत्व प्रकारांचा समावेश. |
| केंद्र सरकारला दिव्यांगत्वाचे आणखी प्रकार जोडण्याचे स्वातंत्र्य आहे. | यांमध्ये अशी कोणतीही व्यवस्था नव्हती. |
| अधिकारांवर आधारित कायदा (Rights Based Act) | धर्मार्थ / सहानुभूती मॉडल वर आधारित कायदा (Charity Based Act) |
| जलद हस्तक्षेप आधारित (Early Intervention) | जलद शोध आधारित (Early Detection) |
| समावेशीत शिक्षण (Inclusive Education) | विशेष शिक्षण (Special Education) |
| समान रोजगार संधि (Open Employment) | शेल्ड वर्कशॉप (Sheltered workshop) |
| पालकांचा सक्रीय सहभाग (Parent Activism) | पालकांचा निष्क्रिय सहभाग (Parent Passive participation) |
| दिव्यांगजनांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी 5% राष्ट्रीय आणि राज्य निधीची निर्मिती. | दिव्यांगजनांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी 3% राष्ट्रीय आणि राज्य निधीची निर्मिती. |
| शैक्षणिक क्षेत्रात 5% आरक्षणाची तरतूद. | शैक्षणिक क्षेत्रात 3% आरक्षणाची तरतूद. |
| नोकरीच्या क्षेत्रात 4% आरक्षणाची तरतूद. | नोकरीच्या क्षेत्रात 3% आरक्षणाची तरतूद. |
| यामध्ये प्रथमच वाक् आणि भाषा दिव्यांगत्व आणि अध्ययन अक्षम दिव्यांगत्व समावेश करण्यात आला आहे. | यांमध्ये फक्त कर्ण-बधिर दिव्यांग व्यक्तींचा समावेश. |
| यामध्ये ॲसिड हल्ला पीडितेचा समावेश करण्यात आला आहे. | यांमध्ये अशी तरतूद नव्हती. |
| रक्ताशी संबंधित 3 विकारांचा यात समावेश करण्यात आला आहे (हिमोफिलिया, थॅलेसेमिया, सिकलसेल). | यांमध्ये अशी तरतूद नव्हती. |
| दिव्यांग व्यक्तींवरील हिंसाचाराच्या प्रकरणांसाठी प्रत्येक जिल्ह्यात एक विशेष न्यायालयाची व्यवस्था. | यांमध्ये अशी तरतूद नव्हती. |
| दिव्यांग व्यक्ति प्रकार, टक्केवार आणि तीव्रता यानुसारलाभ देण्याची तरतूद. | 40% च्या वर दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांग व्यक्तिंना सामान्य लाभ. |

Scanned with CamScanner

# स्वावलंबन कार्ड/Unique ID

खालील लिंकवर जाऊन रजिस्टेशन फॉर्म ऑनलाईन भरून घ्या.

Registration link http://www.swavlambancard.gov.in/pwd/application

## स्वावलंबन कार्डसाठी लागणारी माहिती

| | |
|---|---|
| • पूर्ण नाव | • Full Name |
| • आईचे नाव | • Mother's Name |
| • जन्मतारीख | • Birth date |
| • पूर्ण पत्ता | • Full address |
| • पिन कोड | • Pin Code |
| • ई-मेल आयडी | • E-mail ID |
| • मोबाईल नंबर | • Mobile No. |
| • ब्लड ग्रुप | • Blood group |
| • दिव्यांगत्वाचा प्रकार | • Disability |
| • दिव्यांगत्व केव्हापासून आहे (तारीख) | • Disability date |
| • दिव्यांगत्व कशामुळे आले आहे. | • Disability Cause |

| **खालील कागदपत्रे स्कॅन करून ठेवा** | **Scan Documents:** |
|---|---|
| १) दिव्यांग प्रमाणपत्र | 1) Disability Certificate |
| २) आधार कार्ड | 2) Aadhar Card |
| ३) सही किंवा अंगठा | 3) Signature or Thumb |
| ४) पासपोर्ट फोटो | 4) Photo |

**वेबसाईट**

**www.swavlambancard.gov.in**

Scanned with CamScanner

# दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016
# या कायद्याची अंमलबजावणी

1. दिव्यांगत्व येऊ नये म्हणून दिव्यांगत्व प्रतिबंध व लवकरात लवकर निदान करण्यासाठी आरोग्य विषयक सुविधांची उपलब्धता.

2. दिव्यांग विद्यार्थ्यांना 18 वर्षापर्यंत योग्य अशा वातावरणात मोफत शिक्षण, शिक्षण संस्थांमध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आरक्षण, शिष्यवृत्ती, मोफत गणवेश व प्रवासासाठी सवलत.

3. दिव्यांग व्यक्ती काम करू शकतील, अशा सुयोग्य पदांची निश्चिती व अशा पदांवर शासकीय व निमशासकीय सेवेत दिव्यांग व्यक्तींसाठी 4 टक्के आरक्षण.

4. सार्वजनिक परिवहन पद्धती, नागरी सुविधा व सार्वजनिक इमारती / जागा वापरण्यासाठी दिव्यांग व्यक्तिंना अडथळाविरहीत अशा सुविधा.

5. दिव्यांग व्यक्तींना उद्योग, कारखाने, स्वतःचे घर, विशेष शाळा व खास मनोरंजन केंद्र बांधण्यासाठी मदत म्हणून सवलतीमध्ये जमीन वाटप.

6. दिव्यांग व्यक्तींचे पुनर्वसन व सामाजिक सुरक्षेकरीता विविध उपक्रम.

7. दिव्यांग व्यक्तीविषयक समस्यांवर संशोधन व मनुष्यबळ विकास कार्यक्रम.

8. दिव्यांग व्यक्तींसाठी कार्य करणा-या संस्थांना नोंदणी प्रमाणपत्र. दिव्यांग व्यक्ती अधिकारिता कायदा, 2016 या कायद्यानुसार दिव्यांगत्व नसलेल्या व्यक्तीने दिव्यांगत्वाचे बनावट प्रमाणपत्र मिळवून दिव्यांगांसाठी असलेल्या विशेष सोयी- सुविधांचा लाभ घेण्याचा प्रयत्न केल्यास अथवा घेतल्यास व ते सिद्ध झाल्यास अशी व्यक्ती दंड अथवा 2 वर्षे तुरुंगवास अथवा दोन्ही शिक्षेस पात्र ठरतात.

9. दिव्यांग व्यक्तींसाठी असलेल्या विशेष सोयी-सुविधा अथवा हक्कांपासून दिव्यांग व्यक्तींना वंचित ठेवल्यास अशी दिव्यांग व्यक्ती आयुक्त, दिव्यांग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अभिमत न्यायालयात दाद मागू शकतात.

10. दिव्यांग व्यक्ती अधिकारिता कायदा, 2016 या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्यात राज्य पातळीवर राज्य समन्वय समिती, राज्य कार्यकारी समिती, आयुक्त, दिव्यांग कल्याण व जिल्हा पातळीवर जिल्हा पातळीवर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा समिती ही यंत्रणा कार्यरत आहे.



Scanned with CamScanner

# दिव्यांग उन्नती पोर्टल

जिल्हा प्रशासन नागपूर, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद नागपूर आणि नागपूर महानगर पालिका यांचे संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील (शहरी आणि ग्रामीण) दिव्यांग व्यक्तींच्या सर्वेक्षण आणि सर्व समावेशित पुनर्वसनाचा दृष्टीकोन ठेऊन जिल्ह्यातील दिव्यांग व्यक्तींच्या नोंदणीचे अधिकृत ॲप "दिव्यांग उन्नती पोर्टल" सुरु करण्यात आले आहे.

## जिल्हा प्रशासनाचे आवाहन

जिल्ह्यातील सर्व दिव्यांग व्यक्तींनी https://www.divyangunnatinagpur.in/ या संकेत स्थळावर भेट देऊन आपली नोंदणी करून शासनाच्या विविध कल्याणकारी योजनाची माहिती मिळवून त्या योजनाचा लाभ घ्यावा. **नागपूर महानगर पालिकेतर्फे सर्व झोन ऑफिस आणि जिल्हा परिषदेतर्फे सर्व पंचायत समिती** स्तरावर नोंदणी सुरु आहे.

नैसर्गिकरित्या किंवा अपघाताने दिव्यांगत्व आलेल्या समाजातील दिव्यांग व्यक्तींना त्यांचे हक्क प्राप्त करून देणे आणि त्यांच्यासाठी जाहीर केलेल्या योजनांचा त्यांना पूर्ण लाभ मिळवून देणे यासाठी शासन नेहमी आग्रही असते. या गोष्टीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्नांची आवश्यकता आहे. दिव्यांग व्यक्तींसाठी विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देऊन त्यांचे जीवनमान उंचावणेसाठी जिल्हा परिषद,नागपूर मार्फत नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत "दिव्यांग उन्नती" राबविण्याचे निश्चित झाले आहे.

- दिव्यांगत्व प्रमाणपत्र नसलेल्या लाभार्थ्यांची तपासणी करून त्यांना दिव्यांगत्व प्रमाणपत्र देणे.
- तपासणी पश्चात पुढील उपचारांची आवश्यकता असलेल्या दिव्यांगाना संदर्भ सेवा देऊन शासनाच्या विविध योजनाद्वारे उपचाराच्या सुविधा उपलब्ध करून देणे.
- सर्व पात्र दिव्यांग लाभार्थींना 'स्वावलंबन कार्ड' उपलब्ध करून देणे.
- जिल्ह्यातील सर्व दिव्यांग व्यक्तींची नोंदणी १००% करून ती संकेतस्थळावर online उपलब्ध करणे.



Scanned with CamScanner



## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद् नागपूर

**दिव्यांग कल्याण विभाग अंतर्गत**

# दिव्यांग उन्नती पोर्टल

नागपूर शहरासाठी महानगरपालिका अंतर्गत
क्र. १ ते १० झोन कार्यालय तसेच नागपूर ग्रामीण साठी
पंचायत समिती निहाय मदत कक्ष

## आवश्यक कागदपत्रे

आधार कार्ड | स्कॅन केलेले फोटो | दिव्यांग प्रमाणपत्र/**UDID** | जात प्रमाणपत्र (असल्यास)

## नोंदणी करण्याची प्रक्रिया

- www.divyangunnatinagpur.in या संकेतस्थळाला भेट द्यावी
- 'नवीन नोंदणीसाठी येथे क्लिक करा' या चौकोनात क्लिक करा
- नवीन पासवर्ड नोंदवून सबमिटवर क्लिक करा
- स्कॅन केलेले आवश्यक कागदपत्रे अपलोड करा

**दिव्यांगांसाठी असणाऱ्या विविध योजनांची माहिती व लाभ घेण्यासाठी आवश्यक भेट द्या.**



Scanned with CamScanner

# दिव्यांगांसाठी राष्ट्रीय संस्था (National Institutes)

| | |
|---|---|
| Ali Yavar Jung National Institute for the Speeach & Hearing Disability (Divyangajan)<br>K.C. Marg, Bandra (W) Reclamation, Mumbai-400 050<br>Website: http://ayjnihh.nic.in | अली यावर जंग राष्ट्रीय वाक् एवं श्रवण दिव्यांग संस्था,<br>के.सी. मार्ग, बांद्रा रिक्लेमेशन, बांद्रा(पश्चिम), मुंबई |
| Swami Vivekanand National Institute of Rehabilitation Training and Research (SVNIRTAR), Olatpur, P.O: Bairoi, Dist: Cuttack, Odisha,- 754010<br>Website: http://www.svnirtar.nic.in/ | स्वामी विवेकानंद राष्ट्रीय पुनर्वसन, प्रशिक्षण व संशोधन संस्था,<br>(एस.वी. निरतार) ओलातपुर, पोस्ट बैरोई, जिल्हा कटक, ओरिसा |
| National Institute for Locomotor Disabilities (Divyangajan)<br>BT Road, Bonhooghly, Kolkata - 700 090<br>Website: www.niohkol.nic.in | राष्ट्रीय अस्थी विकलांग (दिव्यांगजन) संस्था<br>बी टी रोड, बोन हुघली, कोलकाता |
| National Institute for the Empowerment of Persons with Intellectual Disabilities (NIEPID).<br>Manovikas Nagar, Bowenpally,<br>Secunderabad-500009 (Telangana)<br>Website: http://niepid.nic.in/ | राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजन सशक्तीकरण संस्था<br>मनोविकास नगर, बोवेनपल्ली,<br>सिकंदराबाद-500-009 (तेलंगणा) |
| National Institute for the Visually Handicapped,<br>NIVH, Dehradun<br>116, Rajpur Road, Dehradun, Uttarakhand<br>Website: www.nivh.gov.in | राष्ट्रीय दृष्टी दिव्यांगजन सशक्तीकरण संस्था,<br>देहरादून, 116, राजपुर रोड,<br>देहरादून, उत्तराखंड |
| Pandit Deendayal Upadhyaya National Institute for Persons with Physical Disabilities (Divyangjan),<br>4, Vishnu Digamber Marg, New Delhi- 110002,<br>Website: www.iphnewdelhi.in | शारीरिक दृष्ट्या दिव्यांगांसाठी<br>पं. दीनदयाल उपाध्याय संस्था,<br>4, विष्णु दिगंबर मार्ग, नवी दिल्ली-110002 |
| National Institute for Empowerment of Persons with Multiple Disabilities (NIEPMD),<br>ChennaiEast Coast Road, Muttukadu, Kovalam Post<br>Chennai-603 112, Tamil Nadu, India. | राष्ट्रीय बहू विकलांग अधिकारिता (दिव्यांगजन) संस्था,<br>ईस्ट कोस्ट रोड, मुट्टकुड्डू, कोवलम पोस्ट<br>चेन्नई - 603112, तमिळनाडू, भारत |

Scanned with CamScanner

# दिव्यांग व्यक्तींकरीता केंद्र शासनाच्या विविध कल्याणकारी योजना

## I. आंतरराष्ट्रीय अधिवेशन (International Conventions)

1) दिव्यांग व्यक्तींच्या अधिकारांवर अधिवेशन (50 लेख)
Convention on the Rights of Persons with Disabilities (50 Articles)
2) दिव्यांग व्यक्तींच्या अधिकारांवरील अधिवेशनासाठ पर्यायी प्रोटोकॉल (18लेख)
Optional Protocol to the Convention on the Rights of Persons with Disabilities (18 Articles)

## II. संवैधानिक/वैधानिक मंडळे (Statutory Bodies)

1. भारतीय पुनर्वसन परिषद (Rehabilitation Council of India)
2. दिव्यांग व्यक्तींसाठी मुख्य आयुक्त
(Chief Commissioner for Persons with Disabilities)
3. आत्मकेंद्रित, सेरेब्रल पाल्सी, मानसिक मंदत्व व बहू विकलांग व्यक्तींच्या कल्याणासाठी राष्ट्रीय न्यास
(National Trust for the Welfare of Persons with Autism, Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities)

## III. केंद्रीय सार्वजनिक क्षेत्र उद्योग (सीपीएसई) (Central Public Sector Enterprises (CPSEs)

1. राष्ट्रीय दिव्यांग अर्थ व विकास महामंडळ (एनएचएफडीसी)
National Handicapped Finance and Development Corporation (NHFDC)
2. भारतीय कृत्रिम अंग निर्माण महामंडळ (एलिम्को)
Artificial Limbs Manufacturing Corporation of India (ALIMCO)

Scanned with CamScanner

# सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय, भारत सरकारच्या दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या गैर-सरकारी संस्थांसाठी योजना (SCHEMES OF THE DEPARTMENT)

1. अपंग पुनर्वसन योजना (DDRS)
Deendayal Disabled Rehabilitation Scheme (DDRS)

अनुदानासाठी मंजूर केलेले उपक्रम/घटक
(Activities/Components Admissible for Grant)

(अ) प्री-स्कूल आणि प्रारंभिक हस्तक्षेप आणि प्रशिक्षणासाठी प्रकल्प (Project for Pre-School and Early Intervention and Training)
(ब) विशेष शाळांसाठी प्रकल्प(Special Schools)
(क) सेरेब्रल पाल्सी मुलांसाठी प्रकल्प (Project for Cerebral Palsied Children)
(ड) व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र (Vocational Training Centres)
(ई) निवारा कार्यशाळा (Sheltered Workshops)
(फ) कुष्ठरुग्णांच्या पुनर्वसनासाठी प्रकल्प (Project for Rehabilitation of Leprosy Cured Persons)
(ज) मानसिकरित्या नियंत्रित III व्यक्ती आणि उपचार झालेल्या व्यक्तींच्या मानसिक-सामाजिक पुनर्वसनासाठी हाफ वे होम (Half Way Home for Psycho-Social Rehabilitation of Treated and Controlled Mentally Ill Persons)
(एच) सर्वेक्षण, ओळख, जागरूकता आणि संवेदनाशी संबंधित प्रकल्प (Project relating to Survey, Identification, Awareness and Sensitization)
(आय) गृह आधारित पुनर्वसन कार्यक्रम / गृह व्यवस्थापन कार्यक्रम (Home Based Rehabilitation Programme/Home Management Programme)
(जे) समुदाय आधारित पुनर्वसन प्रकल्प (Project for Community Based Rehabilitation)
(के) कमी दृष्टी केंद्रांसाठी प्रकल्प(Project for Low Vision Centres)
(एल) मनुष्यबळ विकास प्रकल्प (Projects for Human Resource Development
(एम) सेमिनार/कार्यशाळा/ग्रामीण शिबिरे (Seminars / Workshops / Rural Camps)
(एम) दिव्यांगासाठी पर्यावरण स्नेही आणि इको-प्रोमोटिव्ह प्रकल्प (Environment Friendly and Eco-Promotive Projects for the Handicapped)
(ओ) संगणकासाठी अनुदान(Grant for Computer)
(पी) इमारतीचे बांधकाम(Construction of Building)

Scanned with CamScanner

(क्यू) कायदेशीर साक्षरतेसाठी प्रकल्पज्यातकायदेशीर समुपदेशन, कायदेशीर सहाय्य आणि विश्लेषण आणि विद्यमान कायद्यांचे मूल्यमापन यांचा समावेश आहे. (Project for Legal Literacy, including Legal Counseling, Legal aid and Analysis and Evaluation of Existing Laws)

(आर) जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र (District Disability Rehabilitation Centres)

## 2. सहायक आणि फिटींग साहित्य व उपकरणयोजनेसाठी दिव्यांग व्यक्तींना सहाय्य (ADIP)

**(Assistance to Persons with Disabilities for Purchase / Fitting of Aids / Appliances, (ADIP) Scheme)**

या योजनेचा मुख्य उद्देश दिव्यांग व्यक्तींसाठी टिकाऊ, आवश्यक, अत्याधुनिक आणि शास्त्रोक्त पद्धतीने उत्पादित, आधुनिक, मानक साहित्य आणि उपकरणे यांना प्रोत्साहन देणे आहे. दिव्यांग व्यक्तींच्या शारीरिक, सामाजिक आणि मानसिक पुनर्वसनाचा प्रभाव कमी करून दिव्यांग व्यक्तींची आर्थिक क्षमता वाढवणे. या योजनेंतर्गत पुरविल्या जाणार्या साहित्य आणि उपकरणांद्वारेदिव्यांग व्यक्ती त्यांच्या स्वतंत्र कार्यामध्ये सुधारणा करू शकतात आणि दिव्यांगत्वाची व्याप्ती रोखू शकतात.

## 3. दिव्यांग व्यक्ती अधिकार कायदा, 2016 (सिपडा) च्या अंमलबजावणीची योजना (Scheme for Implementation of Rights of Persons with Disabilities Act, 2016 (SIPDA)

या योजनेअंतर्गत दिव्यांगांच्या क्षेत्रात कार्य करणा-या संस्था/ एजंसींना निम्नलिखित अनुदान सहायता/ आर्थिक सहायतेच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

i) राज्य सरकार/ संघ राज्य क्षेत्रांन (States Governments/Union Territories)

ii) केंद्रीय / राज्य सरकार सह केंद्र/राज्य विद्यापिठांद्वारे स्थापित स्वायत्त संस्था (Autonomous Organizations set up by Central / State Governments including Central/State Universities)

iii) सामाजिक न्याय व हक्क मंत्रालय, भारत सरकार, दिव्यांग सक्षमीकरण विभागाअंतर्गत राष्ट्रीय संस्था/सीआरसी/डीडीआरसी/आरसी/आउटरीच सेंटर (National Institutes/ CRCS / DDRCS / Rcs / Outreach Centres under MSJ & E)

iv) केंद्रीय / राज्य सरकार / संघशासित प्रदेशातील संवैधानिक संघटना (Statutory Organizations of Central / State Govts/UTs)



Scanned with CamScanner

v) केंद्र आणि राज्य सरकार द्वारे स्थापित संस्था/संघटना (Organizations/Institutions set up by Central and State Governments)

vi) केंद्रीय/राज्य मान्यता प्राप्त क्रीडा मंडळ आणि संघ (Central/State recognized Sports bodies & Federations)

vii) अनुदानाकरीता आवश्यक कार्यक्रम/घटक (Activities/components admissible for grant)

viii) जिल्हादिव्यांगता पुनर्वसन केंद्र (डीडीआरसी) (District Disability Rehabilitation Centres (DDRCs)

# दिव्यांग सशक्तिकरण विभाग, सामाजिक न्याय व हक्क मंत्रालय, भारत सरकारच्या विविध योजना (Other Schemes)

## शिष्यवृत्ती योजना (SCHOLARSHIP SCHEMES)

I) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी राजीव गांधी राष्ट्रीय फेलोशिप (Rajiv Gandhi National Fellowship for Students with Disabilities)

ii) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी प्री-मॅट्रिक शिष्यवृत्ति आणि पोस्ट-मैट्रिक शिष्यवृत्ती (Pre-Matric Scholarship and Post-Matric Scholarship for Students with Disabilities)

iii) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीराष्ट्रीय प्रवासी शिष्यवृत्ती (National Overseas Scholarship for students with Disabilities)

vi) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीनिःशुल्क कोचिंगची प्रस्तावित केंद्रीय क्षेत्र योजना (Proposed Central Sector Scheme of Free Coaching for Students with Disabilities)

v) दिव्यांग व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी खासगी क्षेत्रातील नियोक्त्यांना प्रोत्साहन (Incentives to private sectoremployers for providing employment to persons withdisabilities)

vi) जनजागृती आणि प्रचारासाठी योजना (Scheme for Awareness Generation and Publicity))

vii) दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी ट्रस्ट फंड (Trust Fund for Empowerment of Persons with Disabilities)

viii) दिव्यांग व्यक्तींसाठी राष्ट्रीय निधी (National Fund for Persons with Disabilities)



Scanned with CamScanner

ix) केंद्रीय स्तरावरील योजना 'स्थापनेसाठी सहाय्य'/ आधुनिकीकरण/ब्रेल प्रेसच्या क्षमतेत वृद्धी (Central Sector Scheme of "Support for establishment/ modernisation / capacity augmentation of Braille Presses)

x) दिव्यांगासंबंधीचे तंत्रज्ञान, उत्पादने आणि मुद्द्यांसंबंधीच्या केंद्रीय स्तरावरील योजना (Central Sector Scheme on 'Research on disability related technology, products and issues)

xi) प्रगतीसाठीचा नवीन पुढाकार आणि योजना (New Initiatives & Schemes in progress)

xii) इंडियन स्पायनल इंजुरी सेंटर, नवी दिल्ली (Indian Spinal Injuries Centre, New Delhi)

## भारतीय ट्रस्ट अंतर्गत येणाऱ्या संघटनांसाठी योजना

## Schemes of the Organizations under the National Trust

आत्मकेंद्रित, सेरेब्रल पाल्सी, मानसिक मंदता आणि बहुदिव्यांग (नॅशनल ट्रस्ट) असलेल्या व्यक्तींसाठी विविध योजना आणि कार्यक्रम (Schemes & Programmes for persons with Autism, Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities (National Trust)

1 **शिक्षण (Education)**

i) प्राथमिक हस्तक्षेप कार्यक्रम (Early intervention activities)

ii) ज्ञानप्रभा (शिष्यवृती योजना) (GyanPrabha-Scholarship Scheme)

iii) ऑन-लाइन ऑटिझम सूचना व संसाधन केंद्र पोर्टल (Autism Information and Resource Center Portal)

2 **प्रशिक्षण (Training)**

i) सहयोगी – केयर गीव्हर ट्रेनिंग स्कीम (Sahyogi Care GiversTraining Scheme)

ii) स्वयं वकिलीवर तज्ज्ञांचा प्रशिक्षण कार्यक्रम (Mentors Training Program On Self Advocacy)

3. **पुनर्वसन (Rehabilitation)**

i) निरमया (आरोग्य विमा) योजना (Niramaya (Health Insurance) Scheme)

ii) समर्थ (आवासीय देखभाल योजना) (Samarth-Residential Care Scheme)

iii) घरोंदा (लाइफ लांग शेल्टर अँड केयर स्कीम) (Gharaunda-Life Long Shelter and Care Scheme)



Scanned with CamScanner

## दिव्यांगांच्या सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय पुरस्कार / योजना

## National Awards for the Empowerment of Persons with Disabilities

(1) दिव्यांग व्यक्तींसाठी उत्कृष्ट कर्मचारी/स्वयंरोजगार (Best Employee/Self-employed with disabilities)

(ii) सर्वश्रेष्ठ नियोक्ता आणि नियुक्ती अधिकारी किंवा एजंसी (Best Employer and Placement Officer or Agency)

(iii) दिव्यांग व्यक्तींसाठी काम करणारी सर्वोत्कृष्ट व्यक्ती किंवा संस्था (Best Individual and Institution working for the cause of persons with disabilities)

(iv) रोल मॉडल; (Role Model)

(v) बेस्ट एप्लाइड रिसर्च/दिव्यांग व्यक्तींच्या जीवनात सुधारणा आणण्याच्या उद्देशाने केलेले संशोधन किंवा उत्पादनाचा विकास (Best Applied Research / Innovation or Product Development aimed at improving the life of persons with disabilities)

(vi) दिव्यांग व्यक्तींसाठी बाधा रहित पर्यावरण निर्मितीच्या उत्कृष्टकार्यासाठी (Outstanding Work in the Creation of Barrier-free Environment for the persons with disabilities)

(vii) पुनर्वसन सेवा प्रदान करणारा सर्वोत्कृष्ट जिल्हा (Best District in providing rehabilitation service)

(viii) राष्ट्रीय दिव्यांग अर्थ आणि विकास महामंडळाची उत्कृष्ट राज्य चॅनेलायझिंग एजन्सी (Best State Channelizing Agency of the National Handicapped Finance and Development Corporation)

(ix) उत्कृष्ट क्रिएटिव दिव्यांग प्रौढ़ व्यक्ति (Outstanding Creative Adult persons with disabilities)

(x) उत्कृष्ट क्रिएटिव दिव्यांग बालक (Best Creative Child with disabilities)

(xi) बेस्ट ब्रेल प्रेस (Best Braille Press)

(xii) सर्वश्रेष्ठ ॲक्सेसिबल वेबसाइट (Best Accessible Website)

(xiii) दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणाला प्रोत्साहन देणारे सर्वोत्कृष्ट राज्य (Best State in promoting empowerment of persons with disabilities)

(xiv) सर्वोत्कृष्ट दिव्यांग क्रीडापटू (Best Sport person with disability)

**अधिक विस्तृत माहिती दिव्यांग सशक्तिकरण विभाग, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार चे संकेतस्थळ http://disabilityaffairs.gov.in ला नक्की भेट द्या**

Scanned with CamScanner

# दिव्यांग व्यक्तींचे पुनर्वसन आणि कल्याण विषयक महाराष्ट्र राज्याचे शासन निर्णय

| अ. क्र. | जि.आर. दिनांक | विभागाचे नाव | शासन परिपत्रक क्र. | विषय / शीर्षक | सांकेतांक क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 10.08.1989 | समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग | क्र. इडी- 1088 / 12185 / कि.नं.85 / सुधार-2 | दिव्यांग व्यक्तींना साहित्य साधने आणि कृत्रिम अवयव देणेबाबत | |
| 2. | 15.11.2003 | समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग | क्र. इडी- 2003 / प्र.क्र. 71 / सुधार-2 | शालांत परीक्षोत्तर (मेट्रिकोत्तर) शिक्षण घेणा-या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत योजना | |
| 3. | 02.07.2006 | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | अपंग- 2008/प्र.क्र.212/ सुधार-3 | अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारा साठी राबविण्यातयेणा-या बिज भांडवल योजनेअंतर्गत उत्पन्न मर्यादा व प्रकल्प मर्यादा वाढविण्याबाबत | 2010070215042001 |
| 4. | 24.09.2013 | ग्राम विकास विभाग | क्र. व्हीपीएम 2013/ प्र.क्र. 158/परा-3 | राज्यातील अपंगांची ग्रामपंचायतीने नोंदणी करणेबाबत | 20130919132420020 |
| 5. | 17.06.2014 | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | अपंग-2013/प्र.क्र.103/ अ.क.-2 | अपंग-अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहय्याची योजना | 201406171629585222 |
| 6. | 30.08.2014 | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | क्र. अपंग- 2013/प्र.क्र.91/ अ.क. 2 | अपंग विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती मध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या धर्तीवर सुधारणा करणेबाबत | 201408301217559322 |
| 7. | 04.03.2017 | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | क्र. संकीर्ण- 2016/ प्र.क्र.302/विशि-3 | उच्च शिक्षण घेणा-या दिव्यांग विद्यार्थ्यांना परिक्षेमध्ये सोयी- सवलती देणेबाबत | 201703041316252308 |
| 8. | 16.10.2018 | शिक्षण व क्रीडा विभाग | क्र. संकीर्ण- 2017(118/97)/ एस.डी.-6 | इयत्ता 1ली ते इयत्ता 12 वी पर्यंतच्या विशेष गरजा असणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अध्ययन शैलीनुसार मुल्यांकनाबाबत व शैक्षणिक सवलती संदर्भात मार्गदर्शक सूचना | 201810161806468321 |



Scanned with CamScanner

| अ. क्र. | जि.आर. दिनांक | विभागाचे नाव | शासन परिपत्रक क्र. | विषय / शीर्षक | सांकेतांक क्र. |
|---|---|---|---|---|---|
| 9. | 25.06.2018 | ग्राम विकास विभाग | क्र. जिपउ 2018/प्र.क्र.54/ वित्त-3 | पंचायत राज संस्थांनी त्यांच्या स्वउत्पन्नातून 5% निधिच्या घ्यावयाच्या अपंग कल्याणासाठी योजना व खर्चाबाबत मार्गदर्शक सूचना | 201806251213576220 |
| 10. | 13.08.2018 | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | क्र. संकीर्ण 1018/प्र.क्र.204/ विशि-2 | उच्च शिक्षण संचालयाच्या अधिपत्याखालील शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षण व विधि अभ्यासक्रम चालविणा-या शासनाच्या The Rights of Persons with Disabilities Act, 2016 च्या तरतुदीनुसार कार्यवाही करणेबाबत | 201808131554187708 |
| 11. | 20.08.2019 | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | क्र. विसयो 2018/प्र.क्र.62/ विसियो | विशेष सहाय्य योजना संजय गांधी निराधार अनुदान योजना | 201908211212469922 |
| 12. | 21.012.2020 | अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | क्र. बैठक-2020/प्र.क्र.19/ नापु28 | दिव्यांगांना स्वतंत्र शिधापत्रिका देण्याबाबत | 202012281705488406 |
| 13. | 30.05.2023 | महिला व बालकल्याण विभाग | क्र. कालस-2022/प्र.क्र.22/ का-8 | क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेच्या सुधारित मार्गदर्शक सुचनांबाबत | 202305301635125530 |
| 14. | 05.07.2023 | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | क्र. विसयो- 2022/ प्र.क्र.120/विसयो | संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेअंतर्गत सर्व लाभायाच्या अर्थसहाय्यत वाढ करणेबाबत | 202307061137387522 |
| 15. | 22.06.2023 | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | क्र. विसयो-2022/ प्र.क्र.87/ विसयो | विशेष सहाय्य योजनेतील सामान्यांना उत्पन्नाचा दाखला सादर करण्याबाबत | 202306221246304922 |
| 16. | 26.06.2023 | महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मुंबई | क्र. राप/वाह/सवलत / 2445 | दिव्यांग लाभार्थी तसेच दिव्यांग लाभायच्या साथिदारास यु.डी. आय. डी. (UDID) कार्ड च्या आधारे प्रवास सवलत अनुज्ञेय करणेबाबत | |
| 17. | 14.07.2023 | महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, मुंबई | क्र. राप/बाह/सवलत / 2785 | सिकलसेल, एच. आय. व्ही. हिमोफेलियाग्रस्त रुग्ण यांना महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसने विनामुल्य प्रवास सवलत देणेबाबत | |



Scanned with CamScanner

## DISTRICT DISABILITY REHABILITATION CENTRE, District: Nagpur (DDRC)

# जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, नागपूर
# द्वारा दिव्यांग व्यक्तींना देण्यात येणाऱ्या सेवा व सुविधा

### 1. मुल्यमापन व जलद निदान

अ) मानसशास्त्रीय मुल्यमापनः विकासात्मक, बौद्धिक, वर्तनात्मक, व्यक्तिमत्व, व्यवसायिक, शैक्षणिक, अध्ययन अक्षम, क्षमता व अभिक्षमता इत्यादीचे मुल्यमापन.

ब) दृष्टिदोषमापन व श्रवणशक्ती मोजमाप व मुल्यमापन.

### 2. पुनर्वसनात्मक सेवा

अ) वैद्यकीय व चिकित्सात्मक, शल्य-चिकित्सा, कृत्रिम अवयव व साहित्य साधने यांचे मोजमाप व निःशुल्क वितरण.

ब) फिजीयोथेरेपी, ऑक्युपेशनलथेरेपी, स्पिच थेरेपी इत्यादी पुरविणे.

क) मानसशास्त्रीय पुर्नवसन, शिघ्रनिदान व हस्तक्षेप, समुपदेशन व मार्गदर्शन, वर्तनसुधार प्रशिक्षण इत्यादी.

### 3. मनुष्यबळ निर्मिती कार्यक्रम

अ) दिव्यांग क्षेत्रातील विविध ज्वलंत विषयांवर प्रशिक्षण कार्यशाळा, परिसंवाद, चर्चासत्र व जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करणे.

ब) लघुकालीन व सतत पुर्नवसन प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे. दिव्यांग क्षेत्रातील पुनर्वसन तज्ज्ञ, पालक व संघटनांकरीता जीवनमुल्य शिक्षण, सामाजिक कौशल्य प्रशिक्षण इत्यादी शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.

### 4. संशोधन व विकासात्मक कार्य

अ) दिव्यांग क्षेत्रातील विविध विकासात्मक क्षेत्र संशोधन व नाविन्यपुर्ण व आधुनिक महत्वपुर्ण साहित्य साधने आणि विविध प्रकारच्या संशोधनाला प्रोत्साहन देणे.

### 5. कृत्रिम अवयव व साहित्य साधने वितरण

अ) केन्द्र सरकारच्या एडीप या योजने अंतर्गत विविध दिव्यांग प्रवर्गातील व वयोगटातील व्यक्तींना आधुनिक साहित्य साधने व उपकरणे पुरविणे.

### 6. माहिती व दस्तावेज

अ) दिव्यांगत्व आधारित विविध विषयावंर लेख लिहिणे, लिखाणाला प्रोत्साहन देणे, त्यांना प्रकाशित करणे व नविनतम माहिती सर्व दिव्यांग व्यक्तीपर्यंत पोहचविणे, सर्व माहितीचे व दस्ताऐवजांचे संग्रह व जतन करून ठेवणे.

Scanned with CamScanner

# DISTRICT DISABILITY REHABILITATION CENTRE, NAGPUR
## जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, नागपूर

### ध्येय व धोरणे

1. सर्व प्रवर्गातील व सर्व वयोगटातील दिव्यांग व्यक्तींचा शोध घेणे.
2. ग्रामीण, शहरी व दुर्गम भागात विविध प्रकारचे शिबिरे आयोजित करणे.
3. दिव्यांग संबंधित जनजागृती करणे, प्रतिबंधात्मक उपाय यांना प्रोत्साहन देणे, अतिशिघ्र निदान करणे व जलद हस्तक्षेप कार्यक्रम राबविणे,
4. दिव्यांग व्यक्तींना लागणारी आधुनिक कृत्रिम अवयव व साहित्य साधने यांचे तज्ज्ञांकडून मोजमाप वमुल्यमापन करणे, गरजेनुसार योग्य ते साहित्य त्यांना पुरविणे.
5. चिकित्सालयीन सोयी व सुविधा पुरविणे उदा. फिजियोथेरेपी, ऑक्युपेशनल थेरेपी, वाणी चिकित्सा इत्यादी.
6. दिव्यांगत्व प्रमाणपत्र, बस पासेस, रेल्वे सवलत पासेस आणि इतर सूट व सवलती इ. सेवा प्रदान करणे.
7. परिसरातील इतर शासकीय व निमशासकीय संघटनांशी समन्वय साधून, शल्य चिकित्सात्मक सेवा देणे.
8. दिव्यांग व्यक्ती, पालक व कुटुंबांतील संबंधित व्यक्ती यांना मार्गदर्शन व समुपदेशन करणे.
9. अडथळा मुक्त वातावरण (बॅरियर-फ्री एन्व्हायर्नमेन्ट) यांना प्रोत्साहन देणे.
10. शिक्षण, व्यवसायिक प्रशिक्षण व रोजगार इत्यादींकरीता साहाय्यभूत व पूरक सुविधा प्रदान करणे.
11. नियमित व विशेष शाळेतील शिक्षकांना प्रशिक्षण व शिक्षण देणे, सामाजिक व कौटुंबिक प्रशिक्षण देणे,प्रशिक्षणासाठी व स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहित व प्रेरित करणे,
12. स्थानिक साधने व संसाधने यांची निर्मिती करणे, नविन व आधुनिक प्रकारच्या प्रशिक्षण शिबिराची रचनाकरणेव व्यवसायिक प्रशिक्षण देणे, ज्यामुळे ते आर्थिकदृष्ट्या सबळ व प्रबळ होतील.
13. दिव्यांग क्षेत्रात कार्यरत असणा-या विविध प्रशिक्षण व शैक्षणिक संस्था व संघटना यांच्याशी समन्वय साधून दिव्यांग व्यक्तींना प्रशिक्षित करणे.

Scanned with CamScanner

# दिव्यांगजन अधिकार अधिनियम, 2016 नुसार खालील 21 दिव्यांग प्रवर्गाचा समावेश करण्यात आलेला आहे.

| क्र. | दिव्यांग प्रकार |
|---|---|
| १. | **शारीरिक दिव्यांगता** (Physical Disabilities)<br>i) अस्थिव्यंग (Locomotor Disabilities)<br>ii) कुष्ठरोग (Leprosy Cured)<br>iii) मेंदूचा पक्षाघात (Cerebral Palsy)<br>iv) बुटकेपणा (Dwarfism)<br>v) माशपेशीय क्षरण (Muscular Dystrophy)<br>vi) अॅसिड अटॅक (Acid Attack Victim) |
| २. | **दृष्टीदोष** (Visual Impairment)<br>i) पूर्णतः अंध (Blindness)<br>ii) अंशतः अंध (Low Vision) |
| ३. | **श्रवण दोष** (Hearing Impairment)<br>i) कर्ण बधिर (Deaf)<br>ii) ऐकण्यास अडचन (Hard of Hearing)<br>iii) वाक् तथा भाषा दिव्यांगता (Speech & Lang. Disabilities) |
| ४. | **बौद्धिक दिव्यांगता** (Intellectual Disability)<br>i) विशिष्ट अध्ययन अक्षमता (Specific Learning Disabilities)<br>ii) ऑटिझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर (Autism Spectrum Disorders) |
| ५. | **मानसिक वर्तन** (Mental Behaviour)<br>मानसिक आजार (Mental Illness) |
| ६. | **मज्जासंस्थेचे तीव्र आजार** (Chronic Neurological Condition)<br>i) मल्टिपल स्क्लेरोसिस (Multiple Sclerosis)<br>ii) कंपवात रोग (Parkinson's Dis.) |
| ७. | **रक्त सम्बन्धी विकार** (Blood Disorders)<br>i) अधिक रक्तस्त्राव (Hemophilia)<br>ii) थॅलेसिमिया (Thalassemia)<br>iii) सिकल सेल (Sickle Cell Disease) |
| ८. | **बहु दिव्यांगता तथा बधिरान्धता** (Multiple Disabilities & D-B) |
| ९. | **इतर** (Other) |

Scanned with CamScanner

# जिल्हा परिषद नागपूर

# द्वारा दिव्यांग विषयक विविध कल्याणकारी योजना

## जि.प.5 टक्के दिव्यांग कल्याण निधी

### शासन निर्णय : ग्राम विकास विभाग, मुंबई दि. 25/06/2018

**1. दिव्यांग-दिव्यांग व्यक्तींना विवाहसाठी प्रोत्साहनपर अनुदान देणे :**

दिव्यांग-दिव्यांग जोडप्यांना विवाहसाठी प्रोत्साहनपर अनुदान देण्याची योजना असुन या योजनेसाठी किमान 40% किंवा त्यापेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या नागपुर शहर व ग्रामीण भागातील दिव्यांग जोडप्यांनी विवाह झाल्यापासुन एक वर्षाच्या आत प्रस्ताव सादर करणे बंधनकारक आहे. या योजनेत रु.25,000/- अनुदान देण्यात येईल.

